
ePaper

## प्रकाश आंबेडकर हाजीर हो...कोरेगाव भीमा चौकशी आयोगाने बजावले समन्स



| वर्ष - 7 । अंक - 263 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- बुमराहसमोर इंग्रजांनी गुडघे टेकले
- पूनमने मरणाचं नाटक का केलं?
- भारतीय सैनिक मालदीवमधून परतणार
- कारखान्यांवर टॅक्सची तलवार होती


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 04 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## समाविष्ट गावांच्या विकासाला ‘बुस्टर डोस’

# आयटी पार्क ते चिंचवड कनेक्टिव्हीटी!

### शंकर जगताप यांचा पाठपुरावा: 450 ते 500 कोटींच्या रस्ते विकासकामांचा धडाका

**। पिंपरी ।महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघात पायाभूत सुविधा पोहोचवण्यासाठी पुढाकार घेत महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. त्यानुसार वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील ४५० ते ५०० कोटी खर्चाचे सुमारे ३४ किलोमीटर लांबीचे रस्ते करण्यात येणार आहेत. त्यामुळे चिंचवड विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांच्या विकासाला ‘बुस्टर डोस’ मिळाला आहे.**






“पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यात असलेली चिंचवड विधानसभा मतदारसंघातील अनेक रस्ते मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आधी हे रस्ते कोणते याची माहिती गोळा करून ते पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे गेल्या तीन महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर प्रशासनाने त्यावर कार्यवाही करून पहिल्या टप्प्यात वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील ४५० ते ५०० कोटींच्या खर्चाचे रस्ते मंजूर केले आहेत. या सर्व रस्त्यांच्या कामांना लवकरात लवकर सुरू करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचना महापालिका आयुक्तांना केली आहे.

– **शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

विशेष म्हणजे, हे सर्व रस्ते महापालिकेच्या विकास आराखड्यातील (डीपी) आहेत. या रस्त्यांच्या कामांना लवकरच सुरूवात होणार आहे. त्यामुळे पीएमआरडी हद्दीतील मावळचा ग्रामीण भाग आणि हिंजवडी आयटी पार्कसोबत पिंपरी-चिंचवडची कनेक्टिव्हीटी आणखी वाढणार आहे. तसेच नागरिकांना दळणवळणासाठी कायमस्वरुपी चांगले रस्ते उपलब्ध होणार आहेत.

भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी चिंचवड मतदारसंघात रस्त्यांचे जाळे अधिक विस्तृतपणे निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यासाठी त्यांनी चिंचवड मतदारसंघाच्या वेगवेगळ्या भागातील नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. त्याचप्रमाणे त्या भागात जाऊन पाहणीही केली. रस्ते नसल्यामुळे नागरिकांना येणाऱ्या अडचणी त्यांनी जाणून घेतल्या. या भागात अनेक गृहप्रकल्प उभे आहेत. तसेच अनेक गृहप्रकल्पांची कामे सुरू आहेत. अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांनी या भागात शाळा-महाविद्यालये सुरू केली आहेत. जवळच हिंजवडी आयटी पार्क आहे. त्याचप्रमाणे मुंबईला जाण्यासाठी द्रुतगती महामार्गही उपलब्ध आहे. त्यामुळे या भागात वास्तव्याला येणाऱ्यांची संख्या कित्येक पटीने वाढली आहे.

परिणामी, विकास आराखड्यातील रस्ते झालेले नसल्याने या भागातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबी पाहिल्यानंतर शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यातील चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकसित व्हावेत यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे “ब” आणि “ड” प्रभागातील वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील ४५० ते ५०० कोटी खर्चाच्या सुमारे ३४ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांना महापालिका आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

### रावेत, किवळे, मामुर्डी, ताथवडे, पुनावळेकरांना दिलासा...


» नियोजित रस्त्यांमध्ये मुंबई-बंगळुरू महामार्गाला लागून असलेल्या सर्व्हिस रस्त्यांचाही समावेश आहे. त्याचप्रमाणे मामुर्डी स्मशानभूमीजवळ पवना नदीवर सांगवडे व हिंजवडीला जोडणारा पूल, रावेत व किवळे भागात समीर लॉन्समागील नदीजवळील १८ मीटरचा रस्ता, विकासनगरमधील मुख्य रस्ता, पुनावळे अंडरपास ते काटेवस्ती ३० मीटरचा रस्ता, कोयतेवस्ती चौक ते जांभेकडे जाणारा १८ मीटरचा रस्ता, वाकड मधूबन हॉटेल ते इंदिरा रोड ते सिल्व्हर स्कूल हॉटेल २४ व १८ मीटरचा रस्ता तसेच त्या त्या भागातील विकास आराखड्यातील इतर रस्त्यांचा समावेश आहे. त्यामुळे या भागात रस्ते विकासकामांचा लवकरच धडाका सुरू होणार आहे. हे रस्ते करताना ते वारंवार खोदावे लागणार नाहीत अशा पद्धतीने केले जाणार आहेत. पाणीपुरवठ्याची पाईपलाईन, ड्रेनेजलाईन, विद्युतलाईन टाकूनच हे रस्ते कायमस्वरूपी विकसित केले जाणार आहेत.

# राज कपूर हे भारतीय चित्रपटसृष्टीला पडलेले सुंदर स्वप्न : राज्यपाल बैस

## सुवर्णयुगात यांच्यासारख्या महान कलाकाराचा उदय झाला

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कपूर कुटुंबाने आपल्या कर्तृत्वाने हिंदी चित्रपटसृष्टीच्या विकासात आणि उत्कर्षात मोलाचे योगदान दिले आहे. राज कपूर हे भारतीय चित्रपटसृष्टीला पडलेले सुंदर स्वप्न आणि चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजविणारे कलाकार होते, असं राज्यपाल रमेश बैस यांनी प्रथम 'विश्व राजकपूर सिनेरत्न गोल्डन पुरस्कार' वितरण करताना म्हणाले.**

श्री ज्ञानेश्वर वर्ल्ड पीस डोम येथे आयोजित माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी पुणे तर्फे देण्यात येणारा प्रथम 'विश्व राजकपूर सिनेरत्न गोल्डन पुरस्कार' वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यपाल रमेश बैस म्हणाले, भारतीय चित्रपट क्षेत्राच्या सुवर्णयुगात राज कपूर यांच्यासारख्या महान कलाकाराचा उदय झाला. राज कपूर यांनी आपल्या बहारदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत अनेक वर्षे रुपेरी पडद्याची शोभा वाढविली. विविधरंगी भूमिकांद्वारे त्यांनी प्रेक्षकांना हसविले, रडविले आणि प्रेम दिले. चित्रपटांच्या माध्यमातून त्या काळातील सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला. बैस पुढे म्हणाले, त्यांच्या काळात भाषा आणि सांस्कृतिक विविधतेवर मात करत समाजातील विविध घटनांची पार्श्वभूमी असलेल्या चित्रपटांनी समाजाला एकजूट केले होते. सामान्य माणसाशी जोडल्या गेलेल्या त्यांच्या भूमिकांमधून सामान्य माणसाच्या आकांक्षा, त्याचा संघर्ष आणि सन्मान प्रतिबिंबीत झाला आहे. भारतासह रशिया, इजिप्त, मध्य पूर्व आशिया तसेच दक्षिण अमेरीकेतही त्यांचे चित्रपट गाजले. या पुरस्कारामुळे स्व. राज कपूर यांच्या स्मृती चिरंतन राहतील, असे त्यांनी सांगितले.पृथ्वीराज कपूर यांच्यानंतरही कपूर कुटुंबातील अनेक सदस्यांनी चित्रपट क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. या कुटुंबातील सदस्यांनी किमान 300 पेक्षा अधिक चित्रपटात अभिनय, निर्मिती, दिग्दर्शनाचे कार्य केले. भारतीय चित्रपटांच्या सुवर्णयुगात पृथ्वीराज कपूर आणि राज कपूर यांच्यासह अनेक अभिनेते, अभिनेत्री, संगीतकार, कथा लेखक आणि गीतकारांनी केलेले कार्य स्मरणीय आहे. रचनात्मक आणि कलात्मक अभिव्यक्तीचा तो काळ होता.

### चित्रपटांनी समाजाला एकजूट केले

देशातील बदलत्या सामाजिक प्रश्नांचे आणि घटनांचे प्रतिबिंब त्या काळातील चित्रपटात दिसून येत होते. याच काळात राष्ट्रीय एकता बळकट करण्याचे महत्वाचे कार्य भारतीय चित्रपटांनी केले, असे राज्यपाल म्हणाले. चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्राच्या सुवर्ण युगाचा साक्षीदार असल्याचे समाधान आपल्याला लाभले असून स्व.राज कपूर यांच्या अभिनयाचा चाहता असल्याचेही बैस यावेळी म्हणाले. राज्यपाल रमेश बैस म्हणाले, भारतीय चित्रपट क्षेत्राच्या सुवर्णयुगात राज कपूर यांच्यासारख्या महान कलाकाराचा उदय झाला. राज कपूर यांनी आपल्या बहारदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत अनेक वर्षे रुपेरी पडद्याची शोभा वाढविली. बैस पुढे म्हणाले, त्यांच्या काळात भाषा आणि सांस्कृतिक विविधतेवर मात करत समाजातील विविध घटनांची पार्श्वभूमी असलेल्या चित्रपटांनी समाजाला एकजूट केले होते.

---

# ‘डेल ऑर्टो इंडिया’च्या कामगारांना १८ हजारांची पगारवाढ!

## चाकणमधील सर्वाधिक वेतनवाढ : कंपनी व्यवस्थापन- स्वाभिमानी कामगार संघटनेचा करार

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चाकण औद्योगिक पट्ट्यातील सर्वाधिक वेतनवाढ करार करीत डेल ऑर्टो इंडिया प्रा. लि. कंपनीने कामगारांसाठी तब्बल १८ हजार ५०० रुपयांची पगारवाढ केली आहे. त्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**



चाकण- भांबोली येथील डेल ऑर्टो इंडिया प्रा. लि. आणि स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यामध्ये वेतनवाढ करार करण्यात आला. करारावरती संघटनेच्या वतीने प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, प्रमुख सल्लागार रोहिदास गाडे, संघटनेचे अध्यक्ष जीवन येळवंडे, सरचिटणीस कृष्णा रोहोकले, चिटणीस रघुनाथ मोरे, खजिनदार अमृत चौधरी, दत्तात्रय गवारी, प्रशांत पाडेकर, रविंद्र भालेराव, महादेव येळवंडे, ग्रुपो कंपनीचे युनिट अध्यक्ष संजय पाटील, सोमनाथ जानराव, युनिट अध्यक्ष कमलेश भोकसे, उपाध्यक्ष धनेश निघोजकर, सरचिटणीस पांडुरंग मराठे, खजिनदार बाबासाहेब दरेकर यांनी स्वाक्षरी केल्या आहेत. तसेच, व्यवस्थापनाच्या वतीने कंपनीचे डायरेक्ट कमल वाधवा, सी.ओ.ओ. मनोज गर्ग, धरणी सतिशकुमार, एच आर हेड रणपाल सिंह, एच. आर. मॅनेजर ओंकार चव्हाण, यांनी स्वाक्षरी केल्या आहेत. कामगारानी डीजेच्या तालावर नाचून, पेढे वाटून फटाक्यांची आतिषबाजी करून आनंद व्यक्त केला.

### करारानुसार कामगारांना मिळालेले लाभ...

एकूण पगारवाढ :- १८५००/- (आठरा हजार पाचशे रुपये), पगाराचा रेशो:- पहिल्या वर्षी ६०% दुसऱ्या वर्षी २०% तिसऱ्या वर्षी २०% मिळणार. कराराचा कालावधी तीन वर्षांचा राहील. मेडिक्लेम पॉलीसी, मृत्यू साहाय्य योजना, ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी, पगारी सुट्टी, मतदानाची सुट्टी, दुखवटा सुट्टी, पितृत्व रजा, दिवाळी बोनस: सर्व कामगारांना दिवाळी बोनस हा १५०००/- देण्यात येईल., दिवाळी दसरा भेटवस्तू, सेवा कायम करणे:- कंत्राटी कामगारांमधून ३४ कामगार कायम करण्याचा निर्णय मान्य झाला आहे, मासिक हजेरी, व सेवा बक्षीस, कामगारांच्या मुला मुलींसाठी त्यांची गुणवत्ता पाहून बक्षीस योजना, वैयक्तिक कर्ज सुविधा, बस सुविधा किंवा कंपनी पॉलिसी प्रमाणे कार सुविधा, कोणतीही नैसर्गिक आपत्ती किंवा कोविड सारखी परिस्थिती उद्भवल्यास व्यवस्थापन पूर्ण वेतन देण्यास आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत, प्रत्येक कामगाराला प्रत्येकी ७ महिन्याचा फरक पगारामध्ये देण्यात येणार आहे, असे भरघोस लाभ कामगारांना मिळणार आहेत.

# तालेरा रुग्णालयात होणार 'बर्न वॉर्ड'!

## महापालिका प्रशासनाची तयारी : आयुक्त शेखर सिंह यांनी केली पाहणी

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**जळीतग्रस्तांवर तातडीने उपचार व पुनर्वसन करण्यासाठी महापालिकेच्या वतीने जळीत कक्ष उभारण्यात येणार आहे. त्यासाठी जळीत कक्षाचा दर्जा, क्षमता आणि सोयींसुविधांबाबत आराखडा तयार करण्यासाठी अनुभवी तज्ञांची मदत घेतली जात असून हा कक्ष अत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज असणार आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी पत्रकार परिषदेत दिली.**







जळीत कक्षाच्या जागेसाठी महापालिका वैद्यकीय अधिकारी आणि तज्ञांमार्फत महापालिकेच्या आकुर्डी रुग्णालय, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, थेरगाव रुग्णालय तसेच जुन्या तालेरा रुग्णालयाची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान जुन्या तालेरा रुग्णालयाची जागा प्राथमिकदृष्ट्या योग्य वाटली असुन त्यादृष्टीने विचार सुरु आहे. जळीत कक्षाची रचना आणि तेथील अत्याधुनिक सोयीसुविधा, मनुष्यबळ आदींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जळीत कक्षासाठी महापालिका रुग्णालयाच्या संरचनेमध्ये फेरबदल, नूतनीकरण किंवा सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच अत्याधुनिक उपचारासोबत प्लास्टिक सर्जरीची सुविधाही पिडीतांना उपलब्ध करून देण्याचा मानस आहे, असे आयुक्त शेखर सिंह यावेळी म्हणाले.

महापालिकेच्या वतीने विचारधीन असलेल्या ५५० कोटींच्या कर्जाबाबत बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. राज्य शासनाच्या मान्यतेनंतरच पुढील निर्णय घेण्यात येईल. राज्य शासनाच्या अंतिम निर्णयानंतर कर्जातून उभा केलेला निधी हा नव्याने उभारण्यात येणाऱ्या मोशी हॉस्पिटल तसेच जुन्या पुणे मुंबई महामार्गावर उभारण्यात येणाऱ्या अर्बन स्ट्रीट स्केपिंग प्रकल्पासाठी वापरण्यात येईल. पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता भविष्यात आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी महापालिकेला आर्थिकदृष्ट्या गरज भासते. अशावेळी वेगवेगळ्या मार्गांद्वारे निधी उपलब्ध होणे गरजेचे असते.

सद्यस्थितीत शहरातील विविध ठिकाणी करण्यात येणाऱ्या विकासकामांसाठी महापालिकेच्या उत्पन्नातून तसेच केंद्र व राज्य सरकारकडून आलेला निधी तसेच ठेवींमधून खर्च करण्यात येतो. याव्यतिरिक्त विकासकामांच्या निधीसाठी आणखी मार्ग खुले व्हावेत आणि महापालिकेचा आर्थिक ताण कमी व्हावा यासाठी कर्ज हा एक पर्याय आहे. जागतिक पातळीवर अशाप्रकारे निधी उपलब्ध करुन पुढील १० वर्षानंतरचा विचार करुन त्याठिकाणी विकासकामे आणि आवश्यक प्रकल्प उभारले जातात. महापालिकेने देखील असा निधी उभारण्यासाठी केवळ आरएफपी प्रक्रिया केली आहे. आवश्यक समितीची मान्यता आणि राज्य शासनाच्या मान्यतेनंतरच कोणतीही अशी प्रक्रिया अंतिम होत असते.

### 30 टक्के नवीन मालमत्ता नोंदणीकृत नाहीत...

» मागील वर्षी महापालिकेने ८४७ कोटी मालमत्ता कर गोळा केला. यावर्षी महापालिकेने १ हजार कोटी मालमत्ता कर गोळा करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. आतापर्यंतच्या झालेल्या मालमत्ता सर्वेक्षणामध्ये शहरातील अंदाजे ३० टक्के नवीन मालमत्ता नोंदणीकृत नाहीत असे निदर्शनास आले आहे. या मालमत्तांची नोंदणी झाल्यानंतर महापालिकेच्या मालमत्ता करामध्ये ३० टक्के वाढ होईल, असे आयुक्त शेखर सिंह यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.



"तळवडे येथील आग दुर्घटना आणि त्यापूर्वी झालेल्या पूर्णानगर येथील आगीच्या घटनेत निष्पाप लोकांना जीव गमवावा लागला. अशा दुर्घटनेतील जखमींना तात्काळ उपचार मिळावेत. या करिता नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. त्यावेळी महापालिका प्रशासनाला राज्याच्या मंत्रीमहोदय यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार महापालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. लवकरच या 'बर्न वॉर्ड' चे काम सुरू करावे, अशी अपेक्षा आहे.

**-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'आप'ने भाकरी फिरवली!

## शहराध्यक्षपदी मीना जावळे यांची नियुक्ती : शहराच्या राजकारणात पहिलीच महिला शहराध्यक्ष

।पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र प्रभारी गोपाल भाई इटालिया व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अजित फाटके यांनी मीनाताई चंद्रमनी जावळे यांच्यावर विश्वास दर्शवून आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवडच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये एका महिलेला प्रथम अध्यक्षपदाचा मान मिळाला. याबद्दल यावेळी सर्वांनी आनंद व्यक्त केला आहे.**



AAP
AAM AADMI PARTY

मीनाताई जावळे ह्या सामाजिक कार्यामध्ये सतत कार्यरत असतात, त्यांनी महिला बचत गटाच्या माध्यमातून संपूर्ण पिंपरी-चिंचवडमध्ये मोठे जाळे पसरवले आहे. आकुर्डीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छ.शिवाजी महाराज जयंतीउत्सव तसेच अनेक उपक्रम मीनाताई राबवत असतात. आम आदमी पार्टीची सामान्य कार्यकर्ता म्हणून प्रामाणिकपणे काम करताना पिंपरी चिंचवडच्या शहराध्यक्षपदी एका महिलेची संधी देऊन पार्टीने एक नवा पायंडा पाडला आहे. महिला शक्तीच्या जोरावर पिंपरी चिंचवडमध्ये आम आदमी पार्टीचा महापौर निवडून आणू असा विश्वास नवनियुक्त शहराध्यक्ष मीनाताई जावळे यांनी व्यक्त केला आहे. मीनाताई जावळे यांनी यावेळी त्यांच्या झालेल्या नियुक्ती बद्दल गोपाल भाई इटालिया, अजित फाटके आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले आहे.

### शहर 'आप'मध्ये मोठी फूट...




**»दरम्यान, नवीन शहराध्यक्षांची निवड झाल्यानंतर युवक शहराध्यक्ष रविराज काळे यांनी वरिष्ठांवर नाराज होऊन प्रदेश कार्याध्यक्ष अजित फाटके यांचेकडे राजीनामा पाठवला आहे. मावळते शहराध्यक्ष बदलण्यासाठी शहरातील २५ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले होते. तरीसुद्धा वरिष्ठांनी तीच चूक केल्यामुळे नाराज होऊन आपण युवक शहराध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे असे जाहीर केले. यापुढे कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील निर्णय घेणार असेही काळे यांनी जाहीर केले. वरिष्ठांच्या चुकीमुळे आम आदमी पार्टी वाढण्यास खिळ बसेल आणि शहरात असलेले कार्यकर्ते देखील पक्ष सोडतील. तसेच, शहरात नावाला असलेली पार्टी देखील संपेल, असा घणाघातही रविराज काळे यांनी केला आहे.**




# वसाहतवादाच्या वारशाशी लढण्याचे मार्ग

**'वसाहतवादाचा वारसा' या शब्दप्रयोगाला आजकाल राजकीय क्षेत्रात अतोनात महत्त्व आलं आहे गेल्या दीड वर्षापासून. कारण तेव्हा आपली राज्यघटना हाच 'वसाहतवादी वारसा' असल्यामुळे राज्यघटनाच बदलून टाकू, असा सूर एका विद्वानानं लावला होता. हा विद्वान कोणत्या राजकीय पक्षाकडे झुकलेला, वगैरे चर्चा करण्याची ही जागा नव्हे पण 'अतोनात' म्हणजे किती याचं ते उदाहरण होतं.**



त्यानंतर भारत सरकारनंही अनेक कायदे बदलून टाकताना 'वसाहतवादी वारसा आम्ही पुसतो आहोत' असा नैतिक पवित्रा घेतला होता. कला ही राजकारणाच्या बाहेरच असायला हवी वगैरे कबूल. पण 'वसाहतवादाचा वारसा' हा सांस्कृतिक क्षेत्रातही कसा आहे, याची 'सेन्गोल'च्या निमित्तानं झालेली चर्चा असो की या देशाची उन्नत बौद्धिक परंपरा परक्या शासकांमुळेच कशी लयाला गेली हे हल्ली सांगू लागलेल्या काही विद्वानांची पुस्तकं असोत, वसाहतवाद या संकल्पनेच्या पुन्हा होत असलेल्या चिकित्सेतून एक सांस्कृतिक मांडणी केली जाऊ शकते, असं सध्या स्पष्ट दिसतं आहे. सांस्कृतिक अंगांसकट ही पुन्हा होणारी चिकित्सा नवीसुद्धा असावी, यासाठी खरं तर इतिहासाइतकंच 'वसाहतवादी कृतीकार्यक्रमा'कडे- अजेंड्याकडे- नीट पाहावं लागेल, त्यातून वसाहतवाद नेहमी 'परक्या शासकां'चाच असतो का असाही प्रश्न पडेल. वसाहतवादी अजेंडा हा मूलत: भांडवलदारीचा. वसाहतींमधून कमी दरांत कच्चा माल घ्यायचा आणि वसाहतकार देशात धाडून, मूल्यवर्धन करून तो जास्त दरात विकायचा, हे वसाहतवादामुळे होणारं नुकसान असल्याचं साधार मत दादाभाई नौरोजींनी मांडलं होतं. यात ताज्या चिकित्सेसाठी आवश्यक तपशील असा की, वसाहतवादी ज्या क्षेत्रांत 'प्रगत' ठरले होते त्याच क्षेत्रांत वसाहतींमधली प्रजा 'मागास' कशी आहे, हे कथ्यकथन (नॅरेटिव्ह) वसाहतकारांनी ठसवलं होतं. या तथाकथित मागास प्रजेच्या संस्कृती- परंपरांचं वैचित्रीकरण (एग्झॉटिसायझेशन) वसाहतकारांनी केलं होतं. आता आपल्या विषयाकडे येऊ. तो आहे स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोककलांशी भारतीय आणि अभारतीयांनी जी वर्तणूक केली ती या अर्थानं 'वसाहतवादी'च ठरते, हा. उदाहरणार्थ वारली कलेकडे पाहू. वारली समाजातल्या प्रथांचा भाग असलेली ही कला. पण 'वारली आर्ट'कडे लक्ष देताना या समाजाच्या अन्य प्रथांचं निव्वळ वैचित्र्य पाहिलं गेलं. वारली कलेबाबत भास्कर कुलकर्णी यांनी 'वीव्हर्स सर्व्हिस सेंटर'साठी केलेल्या अभ्यासाची चिकित्सा झालेली नाही, पण यशोधरा दालमियांनी जणू याविषयीच्या पहिल्या संशोधक स्वत:च असल्याच्या थाटात लिहिलेल्या 'पेण्टेड वर्ल्ड ऑफ द वारलीज' या पुस्तकात वारली जनजीवनाचं वैचित्रीकरण पदोपदी दिसतं. हेच अन्य लोकचित्रकलांबद्दल झालं आहे. जिव्या सोमा मशे (नेदरलँड्सचा प्रिन्स क्लॉस पुरस्कार- २००९, पद्मश्री- २०११) हे पहिले जगप्रसिद्ध वारली चित्रकार. मशे यांना इटली, जर्मनी आदी देशांत भित्तिचित्रं करण्याची संधी मिळाली, काही युरोपीय कलादालनं त्यांच्या कलाकृती विकायला तयार झाली. आर्थिक व्यवहार पारदर्शक होता का, हा प्रश्नही तेव्हा कुणी विचारला नाही. पण दुसराही मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यांच्या कलाकृतींना प्रसिद्धी मिळाली तसतशी या 'वारली आर्ट'मधली 'डिझाइन्स'(!) कॉपी करण्याचा प्रकार सरसकट होऊ लागला. आपण बौद्धिक संपदेची चोरी करतो आहोतशहरोशहरींच्या 'हॉबी क्लासेस'मध्ये 'वारली आर्ट'चे वर्ग सुरू झाले. यात काहींनी तर वारली कला आणि साधारण तशीच दिसणारी ओडिशातली 'सौरा' शैली यांमध्ये गोंधळ घालून ठेवणाऱ्या तथाकथित डिझाइन्सचा सुळसुळाट केला. हे पाहून दादाभाई नौरोजी नक्कीच संतापले असते. हा झाला पहिला टप्पा. पण जिव्या सोमा मशे काय किंवा राजेश वांगड यांच्यासारखे नंतरच्या पिढीतले चित्रकार काय, त्यांनी बदलत्या भोवतालाला जिथल्या तिथं- जेव्हाचा तेव्हाच प्रतिसाद दिला आणि त्यांच्या चित्रांमध्ये शाळा, डबलडेकर बस, आगगाडी, हॉस्पिटल, ॲम्ब्युलन्स हे सारं येऊ लागलंपुजणाऱ्या सांस्कृतिक परंपरेमधल्या चित्रांत डबलडेकर बस वा ॲम्ब्युलन्स येणं हे सांस्कृतिक गुलामगिरीचं/ शरणागतीचं/ संस्कृतीद्रोहाचं लक्षण ठरवायचं का?

## संपादकीय »

### खुमारी...!

***सिनेर, अल्काराझ, होल्गर रून यांच्या रूपाने टेनिसला नवे विजेते मिळत असतील, तर त्याचा फायदा खेळालाच होणार.***

टेनिसला नवीन पिढीची गरज आहे. भविष्य अनिश्चित असले, तरी सुखावहच म्हटले पाहिजे...' तीन सम्राटांच्या अनभिषिक्त मक्तेदारीच्या पार्श्वभूमीवर उमटलेले हे उद्गार कुण्या टेनिसरसिकाचे वा विश्लेषकाचे नाहीत. ते निघाले आहेत, यान्निक सिनेर या इटालियन नवोन्मेषी टेनिसपटूच्या मुखातून. एरवी इतक्या धाडसी विधानांबद्दल टेनिसमधील त्रिमूर्तीच्या भक्तांकडून सिनेरची शेलक्या शब्दांत निर्भर्त्सना झाली असती. आता ते संभवत नाही, कारण सिनेरने नुकतीच ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा जिंकून कारकीर्दीतले पहिलेवहिले ग्रँड स्लॅम अजिंक्यपद पटकावले आहे. हे करताना उपान्त्य फेरीत नोव्हाक जोकोविच या 'मेलबर्नच्या मनसबदारा'ला त्याने मात दिली आहे टेनिसमधील महान त्रिमूर्तीपैकी स्वित्झर्लंडचा रॉजर फेडरर निवृत्त झाला आहे आणि स्पेनचा राफेल नडाल त्या वाटेवर आहे. त्या सुवर्णयुगातील जोकोविच तेवढा अजूनही खेळतोय.

**कालिदासच्या 'कुमारसंभवम्'च्या पहिल्या सर्गातील हा पहिला श्लोक. त्यावरून कळते की हिमालय हा 'नगाधिराज -पर्वतांचा राजा' – असल्याचे पहिल्या शतकातील कालिदासालाही माहीत होते. पण केवळ १५८ वर्षांपूर्वीही तो नगाधिराज नेमका केवढा लांबरुंद व किती उंच आहे हे मात्र कुणाला माहीत नव्हते.**

# भूगोलाचा इतिहास : आणि हिमालय

कारण त्यापूर्वी हिमालयाचे मोजमाप कधी करण्यातच आले नव्हते.८०३ मध्ये विलियम लॅम्ब्टन यांनी भारताच्या 'ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हे'ची सुरुवात केली, त्याच सुमारास चार्ल्स क्रॉफर्ड हा ब्रिटिश पथकप्रमुख पूर्व नेपाळमध्ये गेला होता. या भागातील पर्वत व शिखरे अतिप्रचंड असल्याचे त्याच्याकडून इतरांना समजले. ते ऐकून कर्नल वेब या ब्रिटिश सेनाधिकाऱ्याने १८०९-१० मध्ये त्या भागातील शिखरांची उंची मोजली. तेथील 'धवलगिरी' हे शिखर २६ हजार फुटाहून उंच असल्याचे त्याने जाहीर केले. मात्र त्यावर कुणाचा विश्वासच बसला नाही. कारण दक्षिण अमेरिकेत बोलेव्हियातील अँडीज पर्वताचे 'अंकोह्युमा' ( उंची २३ हजार १२ फूट) हे त्याकाळी जगातले सर्वोच्च शिखर मानले जाई. पण हिमालय हा जगातला सर्वात उंच पर्वत असण्याची शक्यता क्रॉफर्ड व वेब यांच्यामुळे भूसंशोधकांच्या लक्षात आली. दरम्यान मराठा राज्य लयास गेले. ब्रह्मदेशही जिंकल्यावर बहुतेक भारत व हिमालयाचाही बराच




भाग इंग्रजांच्या अधिपत्याखाली आला. त्यामुळे हिमालयाची मोजमापे घेणे व नकाशे तयार करणे शक्य होऊ लागले. पण नेपाळ व तिबेटमध्ये मात्र परकीयांना मज्जाव होता. १८४३ मध्ये जॉर्ज एव्हरेस्ट निवृत्त झाल्यावर ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हेचे नेतृत्व कर्नल अँड्र्यू वॉ यांचेकडे आले. त्यांच्या काळात हिमालयातील शिखरांची उंची निश्चित करण्याचे काम सुरू झाले. हिमालयाच्या रांगा पूर्व पश्चिम पसरलेल्या आहेत. त्यापैकी भारताच्या बाजूने लागणाऱ्या पहिल्या कमी उंचीच्या रांगांना 'शिवालिक टेकड्या' म्हणतात. त्यानंतर अधिक उंचीच्या 'मध्य हिमालय' व त्याच्या पलीकडे सर्वात उंच 'बृहद् हिमालय' या रांगा आहेत. या तिन्ही रांगांच्या पलीकडे ज्या रांगा आहेत, त्यांना 'पार हिमालय' (ट्रान्स हिमालय) म्हणतात.हिमालयातील सर्वोच्च शिखरे मध्य व बृहद् हिमालय रांगांत आहेत. पण अलीकडे असणाऱ्या शिवालिक टेकड्यांमुळे, त्यांच्या पलीकडची उंच शिखरे दिसत नाहीत. मात्र उत्तर बंगालमध्ये, दार्जिलिंग परिसरात शिवालिक रांगा नाहीत. त्यामुळे अगदी दूरवरून, दार्जिलिंग येथूनही, या भागातील कांचनजंगा व इतर शिखरांचे दर्शन घडते. या सर्व पार्श्वभूमीवर कर्नल वॉ यांनी या परिसरातील शिखरांची मोजणी करण्याचे ठरवले.

या भागातील ७९ शिखरांची उंची व नकाशातील स्थान निश्चित करण्याचे कार्य, वॉ यांच्या नेतृत्वाखाली १८४९ ते १८५५ मध्ये हाती घेण्यात आले. या शिखरांचे वेधही दूरवरूनच घ्यावे लागणार होते. कारण यापैकी बहुतेक शिखरे तिबेट आणि नेपाळमध्ये होती. आणि तिथे परकीयांच्या प्रवेशावर कठोर निर्बंध होते. कुणी परकीय त्या भागात सापडलाच तर त्याला अटक करून कैदेत टाकत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# साखर कारखान्यांवर टॅक्सची तलवार होती

## टांगती तलवार शाहांनी लक्ष घालून दूर केली : अजित पवार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमच्या सर्वांची जातं ही शेतकरी, शेतकऱ्यांच्या पोटी आम्ही जन्माला आलो आहोत. आपल्या साखर कारखान्यांवर इन्कम टॅक्सची तंगती तलवार होती, पण केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी लक्ष घालून ही अडचण दूर केल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. देशाचे पंतप्रधान म्हणून मोदी तिसऱ्यांदा कसं निवडून जातील याकडे सर्वांनी पाहिले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.**



सोलापुरात अजित पवार गटाचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात माजी आमदार रविकांत पाटील, बिज्जू प्राधाने, इरफान शेख, मंदाकिनी तोडकरी या सर्वांनी अजित पवार गटात प्रवेश केला. अजित पवार म्हणाले की, काही विरोधक मोदी पुन्हा निवडून आल्यास निवडणुका होणार नाही असा खोटा प्रचार करत आहेत, पण हे साफ खोटं आहे. आपण सर्व संविधानला मानणारे आहोत. 2019 ला निवडणूक झाल्या आता 2024 मध्ये निवडणुका होत आहेत. मात्र, केवळ लोकांची दिशाभूल करण्याचे काम विरोधक करत आहेत. इंदिरा गांधी यांनी आणीबाणी आणली, पण त्यांनाही पाडण्याचे काम जनतेने केले. त्यांनी सांगितले की, मधल्या काळामध्ये आरक्षणाचा प्रश्न गंभीर होता. सामोपचाराने तोडगा काढण्याचे प्रयत्न आपण केले. कुणाला दुखवण्याचा हेतू राष्ट्रवादी काँग्रेसचा नाही. आम्हाला आशीर्वाद देण्याचे काम करा, आमच्या जास्तीत जागा कशी निवडून येतील यासाठी प्रयत्न करा. मधल्या काळात आम्ही जी भूमिका घेतली, त्या आधी जी भूमिका आपण वेळोवेळी घेतल्या तेव्हा तुम्ही समर्थन दिलं. सरकार कसं चालवायचं? प्रशासनाकडून काम कसं करून घ्यायचं हे आता आम्हाला समजलं आहे, पण त्यासाठी आपल्या ताकदीची गरज असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. तुम्हाला सगळी कामं माझ्याकडून करून घ्यायची असतील, तर संघटना मजबुत करावी लागेल. सोलापुरात आपण कार्यलय सुरु केलं आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने एक दिवस निवडून कार्यालयात बसावे. लोकसभा निवडणूक येत्या काळात आहेत, महायुती म्हणून सगळे वरिष्ठ बसू. काही नावांवर चर्चा झाली असून प्राथमिक नावे ठरवली आहेत, पण अंतिम निर्णय अजून व्हायचा आहे आधुनिक पद्धतीने उसाची शेती करावी लागेल, कमी पाण्यात जास्त उत्पादन देणारा ऊस घ्यावा लागेल. आपण सरकारमध्ये गेल्यानंतर मोहोळला पाचशे कोटी रुपयांची कामे दिली आहेत. तुमच्या सर्वांच्या ताकदीने सोलापूर राष्ट्रवादीमय करू हा विश्वास देतो, असेही त्यांनी सांगितले. सोलापुरात अजित पवार गटाचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात माजी आमदार रविकांत पाटील, बिज्जू प्राधाने, इरफान शेख, मंदाकिनी तोडकरी या सर्वांनी अजित पवार गटात प्रवेश केला. अजित पवार म्हणाले की, काही विरोधक मोदी पुन्हा निवडून आल्यास निवडणुका होणार नाही असा खोटा प्रचार करत आहेत, पण हे साफ खोटं आहे. आपण सर्व संविधानला मानणारे आहोत. 2019 ला निवडणूक झाल्या आता 2024 मध्ये निवडणुका होत आहेत.

### आधुनिक पद्धतीने शेती करावी

» मात्र, केवळ लोकांची दिशाभूल करण्याचे काम विरोधक करत आहेत. इंदिरा गांधी यांनी आणीबाणी आणली, पण त्यांनाही पाडण्याचे काम जनतेने केले. त्यांनी सांगितले की, मधल्या काळामध्ये आरक्षणाचा प्रश्न गंभीर होता. सामोपचाराने तोडगा काढण्याचे प्रयत्न आपण केले. कुणाला दुखवण्याचा हेतू राष्ट्रवादी काँग्रेसचा नाही. आम्हाला आशीर्वाद देण्याचे काम करा, आमच्या जास्तीत जागा कशी निवडून येतील यासाठी प्रयत्न करा. मधल्या काळात आम्ही जी भूमिका घेतली, त्या आधी जी भूमिका आपण वेळोवेळी घेतल्या तेव्हा तुम्ही समर्थन दिलं. सरकार कसं चालवायचं? प्रशासनाकडून काम कसं करून घ्यायचं हे आता आम्हाला समजलं आहे, पण त्यासाठी आपल्या ताकदीची गरज असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. तुम्हाला सगळी कामं माझ्याकडून करून घ्यायची असतील, तर संघटना मजबुत करावी लागेल. सोलापुरात आपण कार्यलय सुरु केलं आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने एक दिवस निवडून कार्यालयात बसावे. लोकसभा निवडणूक येत्या काळात आहेत, काही नावांवर चर्चा झाली असून प्राथमिक नावे ठरवली आहेत, पण अंतिम निर्णय अजून व्हायचा आहे आधुनिक पद्धतीने उसाची शेती करावी लागेल, कमी पाण्यात जास्त उत्पादन देणारा ऊस घ्यावा लागेल.

# छगन भुजबळांच्या राजीनाम्याच्या प्रश्नावर पवारांचे मौन

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छगन भुजबळ यांनी नोव्हेंबरमध्ये राजीनामा दिल्याचं एल्गार मेळाव्यात म्हटलं. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारला असता त्यांनी त्यावर कोणत्याही प्रकारचं भाष्य करण्यास नकार दिला असल्याचं समोर आलं आहे. छगन भुजबळ यांनी राजीनामा दिला या प्रश्नावर अजित पवारांनी तुर्तास तरी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.**





भुजबळांच्या राजीनाम्याची बातमी दिली होती. पण त्यावेळी भुजबळांनीच यावर बोलणं टाळलं होतं. पण आता जाहीर सभेमध्येच भुजबळांनी त्यांच्या राजीनाम्याचा गौप्यस्फोट केल्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलंय. मी भाषण करतो तर विरोधी पक्षनेते राजीनामा मागतात. माझ्या सरकारमधील नेते सुद्धा बोलताय. काल एक जण काहीतरी बडबला की, भुजबळच्या कमरेत लाथ घालून त्याला मंत्रिमंडळच्या बाहेर काढा. 17 नोव्हेंबरला ओबीसीची पहिली रॅली अंबडला झाली. 16 नोव्हेंबरलाच मी मंत्रिमंडळाच राजीनामा देऊन सभेला गेलो. अडीच महिने मी शांत राहिलो. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी सांगितले वाच्यता नको, असा गौप्यस्फोट छगन भुजबळ यांनी ओबीसी महाएल्गार मेळाव्यातून केला आहे. छगन भुजबळ यांच्याकडे सध्या अन्न नागरी पुरवठा हे खातं आहे. तसेच राष्ट्रवादीमध्ये बंड झाल्यानंतर भुजबळांनी अजित पवारांचा हात धरला. पण भुजबळांनी सध्या त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपवला असल्याची माहिती सध्या समोर येत आहे. मी ओबीसी समाजासाठी गेली 35 वर्ष काम करतोय, त्यामुळे समाजासाठी मी राजीनामा देण्यासही मागे पुढे पाहणार नाही, असं देखील छगन भुजबळ यांनी यावेळी म्हटलं. 35 वर्षापासून मी ओबीसीसाठी काम करतोय, त्यामुळे मंत्रीपदाच सोडा आमदारकीचं पण सोयर सुतक मला नाही, अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ दिली होती.

### मुख्यमंत्र्यांकडे सोपवला राजीनामा

» 16 नोव्हेंबरला सकाळी साडेबारा वाजता छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांकडे आपला राजीनामा सोपवला. छगन भुजबळ यांनी राजीनामा दिल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तिघांची 18 नोव्हेंबरला एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये तिन्ही मंत्र्यांनी छगन भुजबळ यांना राजीनामा देऊ नये अशी विनंती केली. त्यांनी राजीनामा दिला तर हे मंत्रिमंडळासाठी योग्य ठरणार नाही, तसेच राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# भारतीय सैनिक मालदीवमधून परतणार!

## मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाचा दावा, भारताची भूमिका काय?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने दावा केला आहे की भारतीय सैनिक मे महिन्यापर्यंत माघारी जाईल. शनिवार 3 फेब्रुवारी रोजी मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, भारत मालदीवमधून आपले सैन्य मागे घेईल हिंद महासागर द्वीपसमूहात तैनात असलेल्या सुमारे 80 सैनिकांची जागा आता भारतीय नागरिक घेतली. द्विपक्षीय सहकार्याशी संबंधित अनेक मुद्द्यांवर दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत झालेल्या सहमतांचा दाखला देत मालदीवने सांगितले की, भारतीय सैनिकांचा पहिला गट 10 मार्चपर्यंत आणि उर्वरित 10 मेपर्यंत देश सोडेल. तसेच आता दोन्ही देशांमधील पुढील द्विपक्षीय बैठक फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात माले येथे होणार असल्याची माहिती देखील यावेळी मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.**



भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, दोन्ही देशांनी विमानसेवा सुरु ठेवण्यास सहमती दर्शविली आहे. मात्र, लष्कराच्या माघारीसाठी कोणत्याही कालमर्यादेचा उल्लेख मंत्रालयाने केलेला नाही. भारताचे म्हणणे आहे की, मालदीवमध्ये तैनात भारतीय सैनिक, डझनभर वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह, देशातील दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना मानवतावादी मदत आणि वैद्यकीय उपचार देतात.इंडो-पॅसिफिक क्षेत्रात आपला प्रभाव वाढवण्यासाठी सध्या अनेक देश धडपडत आहे. त्याचसाठी चीनने देखील मालदीवला स्वतःकडे आकर्षित केले असल्याचं म्हटलं जातं. भारताच्या शेजारी असल्याने मालदीव अत्यंत जवळ आहे. त्यामुळे मालदीवमध्ये भारतीय सैनिक मालदीवमध्ये तैनात असते. तसेच मालदीवला दोन हेलिकॉप्टर आणि एक डॉर्नियर विमान दिले आहे, जे बहुतेक सागरी निरीक्षण, शोध आणि बचाव कार्य आणि वैद्यकीय सुविधांसाठी वापरले जातात. भारतीय सैनिक त्यांच्या ऑपरेशनचे व्यवस्थापन करतात.पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या लक्षद्वीप दौऱ्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. त्यानंतर त्यांच्या या फोटोंवर मालदीवच्या मंत्र्यांनी टीका केली. या सगळ्यानंतर मालदीव आणि भारतामध्ये बराच तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं. अनेकांनी त्यांची मालदीवची ट्रीप देखील रद्द केली. त्यामुळे मालदीवला आर्थिकदृष्ट्या बराच फटका बसला. दरम्यान या सगळ्यामध्ये मालदीव आणि चीनचे देखील संबंध वाढत गेल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे पुन्हा एकदा भारत आणि मालदीवच्या संबंधावर चर्चा सुरु झाली. तर आता मालदीवमधून भारताचे सैन्य देखील माघारी येणार असल्याचं समोर आलं आहे. भारताचे म्हणणे आहे की, मालदीवमध्ये तैनात भारतीय सैनिक, डझनभर वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह, देशातील दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना मानवतावादी मदत आणि वैद्यकीय उपचार देतात.इंडो-पॅसिफिक क्षेत्रात आपला प्रभाव वाढवण्यासाठी सध्या अनेक देश धडपडत आहे. त्याचसाठी चीनने देखील मालदीवला स्वतःकडे आकर्षित केले असल्याचं म्हटलं जातं. मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने दावा केला आहे की भारतीय सैनिक मे महिन्यापर्यंत माघारी जाईल. शनिवार 3 फेब्रुवारी रोजी मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, भारत मालदीवमधून आपले सैन्य मागे घेईल हिंद महासागर द्वीपसमूहात तैनात असलेल्या सुमारे 80 सैनिकांची जागा आता भारतीय नागरिक घेतली. द्विपक्षीय सहकार्याशी संबंधित अनेक मुद्द्यांवर दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत झालेल्या सहमतांचा दाखला देत मालदीवने सांगितले की, भारतीय सैनिकांचा पहिला गट 10 मार्चपर्यंत आणि उर्वरित 10 मेपर्यंत देश सोडेल. तसेच आता दोन्ही देशांमधील पुढील द्विपक्षीय बैठक फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात माले येथे होणार असल्याची माहिती देखील यावेळी मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, दोन्ही देशांनी विमानसेवा सुरु ठेवण्यास सहमती दर्शविली आहे. मात्र, लष्कराच्या माघारीसाठी कोणत्याही कालमर्यादेचा उल्लेख मंत्रालयाने केलेला नाही. भारताचे म्हणणे आहे की, मालदीवमध्ये तैनात भारतीय सैनिक, डझनभर वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह, देशातील दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना मानवतावादी मदत आणि वैद्यकीय उपचार देतात.

### सैनिक मे महिन्यापर्यंत माघारी ?

इंडो-पॅसिफिक क्षेत्रात आपला प्रभाव वाढवण्यासाठी सध्या अनेक देश धडपडत आहे. भारताचे म्हणणे आहे की, मालदीवमध्ये तैनात भारतीय सैनिक, डझनभर वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह, देशातील दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना मानवतावादी मदत आणि वैद्यकीय उपचार देतात.इंडो-पॅसिफिक क्षेत्रात आपला प्रभाव वाढवण्यासाठी सध्या अनेक देश धडपडत आहे. त्याचसाठी चीनने देखील मालदीवला स्वतःकडे आकर्षित केले असल्याचं म्हटलं जातं. मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने दावा केला आहे की भारतीय सैनिक मे महिन्यापर्यंत माघारी जाईल. मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, भारत मालदीवमधून आपले सैन्य मागे घेईल हिंद महासागर द्वीपसमूहात तैनात असलेल्या सुमारे 80 सैनिकांची जागा आता भारतीय नागरिक घेतली. द्विपक्षीय सहकार्याशी संबंधित अनेक मुद्द्यांवर दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत झालेल्या सहमतांचा दाखला देत मालदीवने सांगितले की, भारतीय सैनिकांचा पहिला गट 10 मार्चपर्यंत आणि उर्वरित 10 मेपर्यंत देश सोडेल. तसेच आता दोन्ही देशांमधील पुढील द्विपक्षीय बैठक फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात माले येथे होणार असल्याची माहिती देखील यावेळी मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

# लालकृष्ण आडवाणींना भारतरत्न पुरस्कार जाहीर


## अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञतेने, मी 'भारतरत्न' स्वीकारतो : अडवाणी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्कार भारतरत्न जाहीर करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स खात्यावरून ही माहिती दिली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स पोस्टवर लिहिलंय की, मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केलं जाणार आहे. मी त्यांच्याशी संवाद साधला असून या पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. आमच्या काळातील सर्वात प्रतिष्ठित नेत्यांपैकी एक असलेल्या आडवाणी यांचं भारताच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान आहे. संघटनेच्या तळापासून त्यांनी कामाला सुरुवात केली आणि उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारत देशाची सेवा करण्याचे काम केले. केंद्रीय गृहमंत्री आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी संसदेत उपस्थित केलेले मुद्दे, त्यांची भाषणे आमच्यासाठी




दिशादर्शक आणि समृद्ध असा अनुभव देणारी ठरली आहेत. गेल्या काही वर्षांपासून लालकृष्ण आडवाणी सक्रिय राजकारणातून अलिप्त राहिले होते. जानेवारी महिन्यात राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. राम मंदिराच्या उभारणीसाठी लालकृष्ण आडवाणी यांनी त्यांच्या उमेदीच्या काळात प्रचंड मोठी चळवळ उभारली. बाबरी मशीदीच्या विवादित जागेवर राम मंदिर व्हावं म्हणून त्यांनीच पुढाकार घेतला होता. त्यामुळे प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने आडवाणी पुन्हा एकदा चर्चेत आले होते. सुरुवातीला त्यांच्या प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना निमंत्रण नाकारण्यात आलं होतं. लालकृष्ण अडवाणी यांच्या घरी जाऊन प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी आमंत्रित केलं होतं. परंतु, प्राणप्रतिष्ठा दिनी अयोध्येत तापमान घसरलं होतं. थंडी वाढली होती.

### 2015 साली मिळाला होता पद्मविभूषण

२०१५ मध्ये आडवाणी यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्याच वर्षी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना भारतरत्न प्रदान करण्यात आला. तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी स्वत: त्यांच्या घरी भेट दिली आणि त्यांना हा सन्मान दिला होता. त्यावेळी वाजपेयी ९० वर्षांचे होते आणि ते आजारी होते. मुखर्जी यांनी प्रोटोकॉल मोडून माजी पंतप्रधानांना त्यांच्या कृष्ण मेनन मार्गावरील निवासस्थानी हा पुरस्कार प्रदान केला. प्रखर राष्ट्रभक्त अशा ज्येष्ठ नेते आडवाणी यांनी आपले अखंड आयुष्य समाजकारण आणि राजकारण यासाठी समर्पित केले आहे. अयोध्येत प्रभु श्रीरामचंद्राचे मंदिर व्हावे हे त्यांचे स्वप्न देखील साकार झाले आहे.

# 'सालार 2'मध्ये गोपीचंदची एन्ट्री!




दाक्षिणात्य सुपरस्टार प्रभासच्या 'सालार'या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर चांगलाच धुमाकूळ घातला आहे. आता या सिनेमाच्या दुसऱ्या भागाची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. दरम्यान प्रभासच्या 'सालार 2'मध्ये आणखी एका अभिनेत्याची एन्ट्री झाल्याचं समोर आलं आहे.प्रभास सध्या त्याच्या आगामी 'सालार 2' या सिनेमामुळे चर्चेत आहे. प्रशांत नील या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळणार आहे. 'सालार' या सिनेमाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. 'सालार 2'देखील बॉक्स ऑफिसवर चांगलाच धमाका करेल, असे म्हटले जात आहे. सिनेप्रेक्षकांना आता फक्त या सिनेमाच्या रिलीजची उत्सुकता आहे. मीडिया रिपोर्टनुसार, 'सालार 2'साठी प्रेक्षकांना जास्त प्रतीक्षा करावी लागणार नाही. प्रभास आणि प्रशांत नील लवकरच या सिनेमाच्या रिलीजची घोषणा करतील. सध्या या सिनेमाच्या प्री-प्रोडक्शनचं काम सुरू आहे. या वर्षात नोव्हेंबरमध्ये हा सिनेमा रिलीज होईल, असे म्हटले जात आहे. अशातच आता या सिनेमात एका दाक्षिणात्य सुपरस्टारची एन्ट्री होणार असल्याचं म्हटलं जात आहे. मीडिया रिपोर्टनुसार, प्रभासच्या आगामी 'सालार 2' या सिनेमात त्याचा खास मित्र गोपीचंदची धमाकेदार एन्ट्री झाली आहे. या सिनेमातील एका खास भूमिकेसाठी निर्मात्यांनी गोपीचंद यांना विचारणा केली आहे. गोपीचंदची 'सालार 2'मध्ये एन्ट्री झाल्याने चाहत्यांना आता या सिनेमाची प्रतीक्षा आहे. गोपीचंद दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील एक लोकप्रिय अभिनेता आहे. गोपीचंद दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता असण्यासोबत प्रभासचा खास मित्रदेखील आहे. अनेक वर्षांपासून त्यांची चांगली मैत्री आहे. दोघांचा सिनेप्रवास एकत्र सुरू झाला होता. 'वर्षम' या सिनेमात त्यांनी एकत्र काम केलं होतं.

# खोटी बातमी दिल्याने राखी सावंत भडकली

अभिनेत्री पूनम पांडेच्या निधनाचं वृत्त अफवा असल्याचं समोर आलं आहे. लोकांमध्ये सर्वाइकल कॅन्सरची जनजागृती करण्यासाठी अभिनेत्रीने मोठं पाऊल उचललं आहे. अशातच आता पूनमची खास मैत्रीण राखी सावंतची प्रतिक्रिया समोर आली आहे. राखी सावंत म्हणाली,"पूनम तू तर आम्हाला मोठा धक्काच दिला होतास. तू वेडी आहेस का? स्वतःच्या मरणाचा पब्लिसिटी स्टंट कोण करतं? माध्याम, चाहतावर्गासह माझ्याही भावनांचा तू खेळ केलास. आणि आता जिवंत असल्याचा व्हिडीओ बनवला आहेस. नक्की सुरू काय आहे तुझं? तुझ्या निधनाने मी दुःखी झाले होते".राखी सावंत पुढे म्हणाली,"माझा रिल व्हिडीओ मला सोशल मीडियावर शेअर करायचा होता. पण माझ्या मैत्रीणीचं निधन झालं आहे. आज मी काहीही चांगलं काम करणार नाही असं म्हणत मी तो व्हिडीओ शेअर केला नाही. तुझ्यामुळे मी खूप दुःखी झाले होते. मला अश्रू अनावर झाले होते. तुझ्यामुळे सर्वच हैराण झाले आहेत. मी तुला कितीवेळा फोन केले. तू एकही उचलला नाहीस. तू नॅनो कार आहेस आणि मी मर्सिडिज आहे. पण तू आनंदी राहा..छान आयुष्य जग.. पुन्हा असं वागू नको". पूनम पांडेच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर एकीकडे चाहत्यांना मोठा धक्का बसला तर दुसरीकडे नेटकऱ्यांनी हा पब्लिसिटी स्टंट आहे, अशी शक्यता वर्तवली होती. तसेच जागतिक कर्करोग दिनानिमित्त तिने ही पोस्ट केली असेल, असाही अंदाज बांधला जात होता. आता अभिनेत्रीने व्हिडीओ शेअर करत या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. निधनाची बातमी येण्याच्या दोन दिवस आधीपर्यंत पूनम शूटिंग करत होती.पूनम पांडेने बॉलिवूडच्या अनेक सिनेमांत आणि वेबसीरिजमध्ये काम केलं आहे. कंगना रनौतच्या 'लॉकअप' कार्यक्रमात ती सहभागी झाली होती. या कार्यक्रमानंतर ती चांगलीच ॲक्टिव्ह झाली. वेगवेगळ्या इव्हेंटमध्ये ती स्पॉट झाली आहे. 'हनीमून स्वीट रूम नंबर 911' या सीरिजमध्ये ती शेवटची झळकली आहे.



# जिनिलियाच्या सुखी संसाराची 12 वर्षे

बॉलिवूडसह मराठी मनोरंजनसृष्टी गाजवणारा रितेश देशमुख आणि जिनिलिया डिसुजा नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. महाराष्ट्राचे लाडके दादा-वहिनी म्हणून ते ओळखले जातात. रितेश-जिनिलिया 3 फेब्रुवारी 2012 रोजी लग्नबंधनात अडकले होते. आज त्यांच्या लग्नाला 12 वर्षे पूर्ण झाली आहेत. रितेश-जिनिलियाच्या सुखी संसाराची 12 वर्षे खूपच कमाल होती. रितेश देशमुख आणि जिनिलिया देशमुख यांची लव्हस्टोरी खूपच कमाल आहे. 'तुझे मेरी कसम'पासून ते महाराष्ट्राचे लाडके दादा-वहिनी होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास खूपच कमाल होता. रितेश-जिनिलियाची पहिली भेट 'तुझे मेरी कसम' या सिनेमाच्या सेटवर झाली. पण त्यावेळी जिनिलियाने रितेशकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं होतं. पण पुढे त्यांच्यात मैत्री झाली.'तुझे मेरी कसम'नंतर त्यांचा 'मस्ती' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला. या सिनेमाच्या शूटिंगदरम्यान ते एकमेकांच्या प्रेमात पडले. दहा वर्षे ते एकमेकांना डेट करत होते. 10 वर्षांच्या डेटिंगनंतर त्यांनी 3 फेब्रुवारी 2012 रोजी लग्न करण्याचा निर्णय घेतला. ख्रिश्चन आणि हिंदू अशा दोन्ही पद्धतीत त्यांचं लग्न झालं होतं. रितेश-जिनिलियाच्या मुलांची नावे रियान आणि राहिल अशी आहेत.

# पूनमने मरणाचं नाटक का केलं?

अभिनेत्री पूनम पांडे जिवंत असल्याचं समोर आलं आहे. अशातच आता अभिनेत्रीने सर्वायकल कॅन्सरसंबंधित वेबसाईट सुरू केली आहे. सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत तिने यासंदर्भात माहिती दिली आहे.पूनम पांडेची अशी वेबसाईट आहे. हॉटरफ्लाय ही एक सौंदर्य, फॅशन संदर्भातील वेबसाईट आहे. या वेबसाईटसोबत पूनमने करार केला आहे. पूनमने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत आपण हॉटरफ्लायसोबत भागीदारी केल्याचं सांगितलं आहे. पूनम पांडेच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर हे पब्लिसिटी स्टंट असल्याची दाट शक्यता वर्तवली गेली होती. पण तिने तिच्या नव्या वेबसाईटच्या प्रमोशनसाठी मरणाचं नाटक केलं होतं. आता वेबसाईट लाँच करत अभिनेत्रीने चाहत्यांना आणि नेटकऱ्यांना यासंदर्भात माहिती दिली आहे.

# रश्मिका मंदाना अन् विजय देवरकोंडाचं अफेअर?

दाक्षिणात्य सुपरस्टार विजय देवरकोंडाआणि रश्मिका मंदाना यांच्या रिलेशनच्या चर्चा चांगल्याच रंगल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या अफेअरच्या बातम्या समोर येत आहेत. दरम्यान आता अभिनेत्रीने यासंदर्भात भाष्य केलं आहे.रश्मिका आणि विजय एकमेकांचे चांगले मित्र आहेत. आता नुकतच रश्मिकाने विजयसोबतच्या तिच्या नात्याबद्दल भाष्य केलं आहे. काही दिवसांपूर्वी रश्मिका-विजयच्या साखरपुड्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. पण नंतर या अफवा असल्याचं समोर आलं. दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना सध्या तिच्या 'ॲनिमल' या सिनेमामुळे चर्चेत आहे. सिनेमागृहात धमाका केलेला हा सिनेमा ओटीटीवर रिलीज झाला आहे. सध्या अभिनेत्री या सिनेमाचं जोरदार प्रमोशन करत आहे. विजयसोबतच्या नात्याबद्दल बोलताना रश्मिका मंदाना म्हणाली,"विजू आणि मी एकत्र लहानाचे मोठे झालो आहोत. त्यामुळे माझ्या आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा तो भाग आहे. मी घेत असलेल्या प्रत्येक निर्णयात विजय त्याचं मत मांडत असतो".रश्मिका मंदाना पुढे म्हणाली,"विजय मला प्रत्येक गोष्टीत सल्ला देत असतो. मीदेखील त्याच्या प्रत्येक सल्लाचा सन्मान करत असते. माझ्यासाठी एखादी गोष्ट चांगली वाटत असेल तर तो मला त्यासंदर्भात कळवतो. माझ्या आयुष्यातील प्रत्येकाचा मला पाठिंबा आहे". रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांची पहिली भेट 'गीता गोविंदम'च्या शूटिंगदरम्यान झाली आहे. 2018 मध्ये प्रदर्शित झालेला हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. या सिनेमाच्या शूटिंगदरम्यान त्यांची चांगली मैत्री झाली.



# कोहलीच्या खेळण्यावर सस्पेंस कायम!

## इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारत 0-1 ने पिछाडीवर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**टीम इंडियाचा किंग स्टार फलंदाज विराट कोहलीने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांमधून तडकाफडकी माघारीचा निर्णय घेतल्याने एकच खळबळ उडाली. दुसरीकडे, बीसीसीआयला मालिकेतील शेवटच्या तीन सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा करायची आहे. मात्र, मालिकेतील शेवटच्या तीन सामन्यांमध्ये त्याच्या खेळण्यावर सस्पेंस अजूनही कायम आहे. रजत पाटीदारला इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पदार्पणाची संधी मिळाली, त्याला कोहलीच्या जागी संघात स्थान मिळाले.**



दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून कोहलीच्या माघारीची सातत्याने चर्चा रंगली आहे. अनुष्का शर्मा दुसऱ्यांदा आई होणार असल्याची चर्चा रंगली असतानाच त्याच्या आईची तब्येत बरी नसल्याची चर्चा रंगली. मात्र, आईची तब्येत ठणठणीत असल्याचा खुलासा कोहलीच्या भावाला करावा लागला. यानंतर आता कोहलीचा जिगरी दोस्त एबी डिव्हिलियर्सने कोहलीच्या माघारीवर गुपित फोडून टाकलं आहे. डिव्हिलियर्सने दिलेल्या माहितीनुसार विराट आणि अनुष्काला दुसऱ्या बाळाची प्रतीक्षा आहे. त्यामुळे विराट कुटुंबासोबत सर्वाधिक वेळ घालवत आहे. आता डिव्हिलियर्सनेच सांगितल्याने कोहली दुसऱ्यांदा बाबा होणार असल्याचे जवळपास निश्चित आहे. दुसरीकडे, क्रिकबझच्या अहवालात विराट कोहली सध्या भारताबाहेर असल्याचे म्हटले आहे. ज्यामुळे तो इंग्लंडविरुद्धचे शेवटचे तीन कसोटी सामने खेळणार की नाही यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. अहवालात म्हटले आहे की, 'स्टार फलंदाज सध्या देशाबाहेर आहे, त्यामुळे उर्वरित सामन्यांमध्ये त्याच्या उपलब्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.' मालिका सुरू होण्यापूर्वी कोहलीने बीसीसीआयशी चर्चा केली होती आणि वैयक्तिक कारणांमुळे दोन कसोटी सामन्यांमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी बीसीसीआयने त्याला परवानगीही दिली होती. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारत 0-1 ने पिछाडीवर आहे. हैदराबादमधील पहिला सामना इंग्लंडने 28 धावांनी जिंकला होता. पहिल्या डावात 190 धावांची मोठी आघाडी मिळवूनही भारताने सामना गमावला. दुसऱ्या डावात कसोटी पदार्पण करणाऱ्या इंग्लंडचा फिरकी गोलंदाज टॉम हार्टलीने भारताच्या 7 फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवत सामना जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचवेळी विशाखापट्टणममध्ये उभय संघांमध्ये दुसरी कसोटी खेळली जात आहे. या कसोटीवर भारताने पकड मिळवली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून कोहलीच्या माघारीची सातत्याने चर्चा रंगली आहे. अनुष्का शर्मा दुसऱ्यांदा आई होणार असल्याची चर्चा रंगली असतानाच त्याच्या आईची तब्येत बरी नसल्याची चर्चा रंगली. मात्र, आईची तब्येत ठणठणीत असल्याचा खुलासा कोहलीच्या भावाला करावा लागला. यानंतर आता कोहलीचा जिगरी दोस्त एबी डिव्हिलियर्सने कोहलीच्या माघारीवर गुपित फोडून टाकलं आहे. डिव्हिलियर्सने दिलेल्या माहितीनुसार विराट आणि अनुष्काला दुसऱ्या बाळाची प्रतीक्षा आहे. त्यामुळे विराट कुटुंबासोबत सर्वाधिक वेळ घालवत आहे. आता डिव्हिलियर्सनेच सांगितल्याने कोहली दुसऱ्यांदा बाबा होणार असल्याचे जवळपास निश्चित आहे. दुसरीकडे, क्रिकबझच्या अहवालात विराट कोहली सध्या भारताबाहेर असल्याचे म्हटले आहे. ज्यामुळे तो इंग्लंडविरुद्धचे शेवटचे तीन कसोटी सामने खेळणार की नाही यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. अहवालात म्हटले आहे की, 'स्टार फलंदाज सध्या देशाबाहेर आहे, त्यामुळे उर्वरित सामन्यांमध्ये त्याच्या उपलब्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.' टीम इंडियाचा किंग स्टार फलंदाज विराट कोहलीने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांमधून तडकाफडकी माघारीचा निर्णय घेतल्याने एकच खळबळ उडाली. दुसरीकडे, बीसीसीआयला मालिकेतील मात्र, मालिकेतील शेवटच्या तीन सामन्यांमध्ये त्याच्या खेळण्यावर सस्पेंस अजूनही कायम आहे.

### विराट कुटुंबासोबत वेळ घालवत आहे

» गेल्या काही दिवसांपासून कोहलीच्या माघारीची सातत्याने चर्चा रंगली आहे. अनुष्का शर्मा दुसऱ्यांदा आई होणार असल्याची चर्चा रंगली असतानाच त्याच्या आईची तब्येत बरी नसल्याची चर्चा रंगली. मात्र, आईची तब्येत ठणठणीत असल्याचा खुलासा कोहलीच्या भावाला करावा लागला. यानंतर आता कोहलीचा जिगरी दोस्त एबी डिव्हिलियर्सने कोहलीच्या माघारीवर गुपित फोडून टाकलं आहे. डिव्हिलियर्सने दिलेल्या माहितीनुसार विराट आणि अनुष्काला दुसऱ्या बाळाची प्रतीक्षा आहे. त्यामुळे विराट कुटुंबासोबत सर्वाधिक वेळ घालवत आहे.

# बुमराहसमोर इंग्रजांनी सपशेल गुडघे टेकले

## बुमराहने 6 फलंदाजांना बाद केले; इंडियाकडे 171 धावांची आघाडी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विशाखापट्टणम कसोटीत इंग्लंडचा पहिला डाव 253 धावांवर आटोपला. त्यामुळे भारतीय संघाला 143 धावांची आघाडी मिळाली. जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीसमोर इंग्रजांनी सपशेल गुडघे टेकले. जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीसमोर इंग्लिश फलंदाज हतबल आणि असहाय्य दिसत होते.**





बुमराहने इंग्लंडच्या 6 फलंदाजांना बाद केले. याशिवाय कुलदीप यादवने 3 बळी घेतले. अक्सर पटेलने एक विकेट घेतली. टीम इंडियाने दुसऱ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा बिनबाद 28 अशी मजल मारली आहे. यशस्वी 15 आणि रोहित 13 धावांवर खेळत आहे. टीम इंडियाकडे 171 धावांची आघाडी असल्याने विजय आवश्यक असलेल्या कसोटीवर पकड मिळवली आहे. याआधी भारताचा डाव 396 धावांवर आटोपला. प्रत्युत्तरात फलंदाजीला आलेल्या इंग्लंडची सुरुवात चांगली झाली. इंग्लंडचे सलामीवीर बेन डकेट आणि जॅक क्रॉलीने पहिल्या विकेटसाठी 59 धावांची भागीदारी केली. बेन डकेटने 21 धावा केल्या. यानंतर 114 धावांच्या स्कोअरवर दुसरा धक्का बसला. जॅक क्रॉली 76 धावा करून अक्षर पटेलचा बळी ठरला. जॅक क्रॉलीनंतर इतर फलंदाज क्रमाने पॅव्हेलियनमध्ये परतले. इंग्लंडकडून जॅक क्रॉलीने सर्वाधिक 76 धावा केल्या. यानंतर इंग्लिश कर्णधार बेन स्टोक्सने 47 धावांची खेळी केली. मात्र उर्वरित फलंदाजांनी निराशा केली. इंग्लिश फलंदाज ठराविक अंतराने पॅव्हेलियनमध्ये परतत राहिले. याआधी भारतीय कर्णधार रोहित शर्मीने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या टीम इंडियाने 396 धावा केल्या.

### जॅक क्रॉलीने शानदार खेळी

» भारताकडून सलामीवीर यशस्वी जैस्वालने सर्वाधिक 209 धावा केल्या. मात्र याशिवाय भारताच्या एकाही फलंदाजाला पन्नास धावांचा टप्पा गाठता आला नाही. इंग्लंडकडून जिमी अँडरसन, शोएब बशीर आणि रेहान अहमद यांनी प्रत्येकी 3 बळी घेतले. हैदराबाद कसोटीचा नायक टॉम हार्टलीला 1 यश मिळाले. विशाखापट्टणम कसोटीत इंग्लंडचा पहिला डाव 253 धावांवर आटोपला. त्यामुळे भारतीय संघाला 143 धावांची आघाडी मिळाली. जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीसमोर इंग्रजांनी सपशेल गुडघे टेकले. जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीसमोर इंग्लिश फलंदाज हतबल आणि असहाय्य दिसत होते.